**शपथेवर सुरू सरतपास गैरअर्जदार यांच्या तर्फे अधिवक्ता श्री खेळकर वा. म. :—**

०४. आता मला माझे शपथपत्र नि. सी—६ दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**शपथेवर सुरू उलटतपास अर्जदार यांच्या तर्फे अधिवक्ता श्रीमती दाते :—**

०५. मयत अक्षय हा विनापरवानगी ने माझा ट्रक घेवून गेला अशी तक्रार मी पोलिस स्टेशनला दिली नाही. अपघात झाल्यानंतर मला पोलिसांनी घटनास्थळी बोलाविले होते व मी त्याठिकाणी गेलो होतो. हे म्हणने खरे आहे की घटनास्थळ पंचनामा करतेवेळी पंच साक्षीदार व पोलिस यांच्या समक्ष मी ट्रक क्र. एम एच ३१ सी क्यु २७७० हा माझे मालकीचा आहे. हे म्हणने खरे नाही की घटनास्थळ पंचनामा चे वेळी मी पोलिस व पंच यांच्या समक्ष सांगितले होते की मयत अक्षय हा सदर टक ने दि. १९/०५/२०२२ रोजी वडसा जि. गडचिरोली येथून फॉरेस्ट डेपो मधून ट्रक मध्ये लाकूड भरून मजूर नामे प्रशांत नगराळे, मंगेश टिपले, महिपाल मडचाफे, बाळकृष्ण तेलंग, साईनाथ कोडापे, संदिप आतराम यांच्या सह चंद्रपूर कडे येत असतांना अजयपूर गावाजवळ अपघात झाला.

०६. हे म्हणने खरे नाही की अर्जदाराने दि. १६/०८/२०२२ रोजी मला पाठविलेल्या नोटिसचे मी उत्तर दिले नाही. साक्षीदार स्वत सांगतो की मी उत्तर दिले आहे. मी उत्तराची प्रत रेकॉर्डवर दाखल केलेली नाही. सदर उत्तराची प्रत मी अभिलेखावर का दाखल केली

नाही ते मला सांगता येत नाही. हे म्हणने खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/–
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. १७.०९.२०२५.